# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन), अधिनियम, २०१५

"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१

ई-मेलः fra.govmh@gmail.com
संकेतस्थळः www.mahafra.org
दूरध्वनीः ०२२-३१९८०३४८ / मोबाईल क्र.८८२८७८६२६४


## शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त

**दिनांक : ०२ एप्रिल, २०२५**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश आणि शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम ११ (२)(३)(४) अंतर्गत स्थापन केलेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाची बैठक **दि.०२ एप्रिल, २०२५** रोजी बैठक रुम क्र.३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे संपन्न झाली.

**खालील सदस्य उपस्थित/अनुपस्थित होते :**

| | | |
|---|---|---|
| १ | मा. न्यायाधीश विजय एल.आचलिया (निवृत्त)<br>अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| २ | डॉ.विजय वसंत खोले<br>मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ३ | श्री.मनोज दामोदर चांडक<br>सनदी लेखापाल<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ४ | श्री.नितीन बापुराव चव्हाण<br>सनदी लेखापाल<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ५ | श्री.रत्नाकर (शिरीष) फडतरे<br>परिव्यय लेखापाल,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ६ | श्री.अतुल दामोदर धारप<br>परिव्यय लेखापाल,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ७ | श्री.ॲड.धमेंद्र दिलीप मिश्रा<br>व्यावसायिक शिक्षणतज्ञ,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ८ | संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई<br>पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण (म.रा.)<br>पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| १० | आयुक्त वैद्यकीय शिक्षण (म.रा.)<br>पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ११ | संचालक, आयुष (म.रा.)<br>पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| १२ | महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेचे सदस्य सचिव, पुणे आणि पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| १३ | डॉ.अर्जुन चिखले, भा.प्र.से.<br>सदस्य सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |

**विषय क्र.१: दि. २६, २७ आणि २८ मार्च, २०२५ रोजी झालेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत**

"चर्चा झाली.

दि.२६, २७ आणि २८ मार्च, २०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले आणि मंजूर झाले.

**विषय क्र.२: शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी शुल्क मंजुरीच्या प्रस्तावांवर विचार करणे.**

"चर्चा केली.

प्रस्तावांच्या समर्थनार्थ सादर केलेल्या प्रस्तावांची आणि कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर खाली नमूद केलेल्या संस्था/महाविद्यालयांचे शुल्क खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

| Sr. No. | College Code | Name of the Institute | Course | Fees Approved for the A.Y. 2025-2026 Per student as per u/s. 2(g) of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees ) Act, 2015 |
|---|---|---|---|---|
| 1 | EN6265 | Walchand Institute of Technology, Solapur | **B. Engg** | **1,31,000/-** |
| | | | **M.Engg.** | **1,03,000/-** |

**विषय क्र.३ : संस्थांनी सादर केलेले शुल्क प्रस्ताव मागे घेणे/लिंक ओपन करणे/भरलेला प्रस्ताव दुरुस्ती करणे/** 'No Upward Revision' **इत्यादीबाबतचे अर्ज/मान्यतेबाबत**

अ. शैक्षणिक वर्ष २०२४ -२०२५ व २०२५-२०२६ साठी ऑनलाईन शुल्क प्रस्ताव सादर करण्यासाठी लिंक ओपन करुन देणेबाबत.

**शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी ऑनलाइन शुल्क प्रस्ताव सादर करण्यासाठी लिंक ओपन करुन देण्यासाठी पत्र सादर केलेल्या संस्थांची यादी**

शु.नि.प्रा
०२.०४.२०२५

| अ. क्र. | कोड | संस्थेचे नाव | अभ्यासक्रम | ईमेल/ पत्र आवक दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | PH2575 | गुरुकृपा इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी (पदवी) | PH | 27-02-2025 |
| 2 | BSCN9266 | वर्धमान कॉलेज ऑफ नर्सिंग करंजा लाड, वाशिम | BSCN | 04-03-2025 |
| 3 | LLB5088 | विनायक विधी महाविद्यालय | LLB | 28-02-2025 |
| 4 | BAMS0033 | श्री.के.आर.पांडव आयुर्वेद कॉलेज आणि हॉस्पिटल | BAMS | 06-03-2025 |
| 5 | BAMS03286 | श्रीमती शालिनीताई मेघे आयुर्वेद कॉलेज हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर | BAMS | 06-03-2025 |
| 6 | BSCN9373 | वैजनाथराव मुकुंदराव देशमुख (व्हीएमडी) कॉलेज ऑफ नर्सिंग | BSCN | 05-03-2025 |
| 7 | BAMS03193 | उमा चॅरिटेबल ट्रस्ट, शांताबाई शिवशंकर आरळी आयुर्वेद हॉस्पिटल ॲन्ड कॉलेज, जथ, सांगली | BAMS | 05-03-2025 |
| 8 | PH5469 | पी.जी.कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल सायन्स ॲन्ड रिसर्च | PH | 03-03-2025 |
| 9 | BHMS0003 | विरार होमिओपथिक मेडिकल कॉलेज | BHMS | 01-03-2025 |
| 10 | BABM18229 | राजश्री शाहू महाराज कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर बिझनेस मॅनेजमेंट | BABM | 01-03-2025 |
| 11 | BHMS0015 | वेणुताई चव्हाण होमिओपथिक मेडिकल कॉलेज, कोल्हापूर | BHMS | 28-02-2025 |
| 12 | MB3357 | एस ए व्ही आचार्य इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज | MB | 06-03-2025 |
| 13 | PH3533 | वाय एन पी कॉलेज ऑफ फार्मसी, पालघर, डहाणू | PH | 05-03-2025 |

शु.नि.प्रा
०२.०४.२०२५

| अ.क्र. | कोड | संस्थेचे नाव | अभ्यासक्रम | ईमेल/ पत्र आवक दिनांक |
|---|---|---|---|---|
| 14 | EN3194 | विद्यावर्धिनीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी, वसई, ठाणे | EN/MBA/ME | 13-03-2025 |
| 15 | PH6258 | चौधरी अतारसिंग यादव मेमोरिअल एज्युकेशन ट्रस्टचे सिध्दांत कॉलेज ऑफ फार्मसी | PH | 17-03-2025 |
| 16 | PH2618 | श्री संभाजी कॉलेज ऑफ फार्मसी, खडकुट, नांदेड | PH | 24-03-2025 |
| 17 | BAMS0010 | श्री अण्णासाहेब डांगे आयुर्वेद मेडिकल कॉलेज, आष्टा, वालवा, सांगली | BAMS | 24-03-2025 |
| 18 | MB6134 | सिध्दांत इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, पुणे | MB | 24-03-2025 |
| 19 | LLB31184 | लॉ कॉलेज, किन्हवली, शहापूर, ठाणे | LLB3 | 27-03-2025 |
| 20 | BAMS0030 | धन्वंतरी आयुर्वेद मेडिकल कॉलेज, उदगीर, लातूर | BAMS | 28-03-2025 |

**शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी ऑनलाइन शुल्क प्रस्ताव सादर करण्यासाठी लिंक ओपन करुन देण्यासाठी पत्र सादर केलेल्या संस्थांची यादी**

| अ.क्र. | कोड | संस्थेचे नाव | अभ्यासक्रम | ईमेल/ पत्र आवक दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | BAMS03193 | उमा चॅरिटेबल ट्रस्ट, शांताबाई शिवशंकर अरली आयुर्वेद हॉस्पिटल अॅन्ड कॉलेज, जथ, सांगली | BAMS | 05-03-2025 |
| २ | PH3533 | वाय एन पी कॉलेज ऑफ फार्मसी, पालघर, डहाणू | PH | 05-03-2025 |
| ३ | PT06188 | डॉ.बी.बी.खलाडकर फिजिओथेरपी कॉलेज | PT | 01-03-2025 |

| अ. क्र. | कोड | संस्थेचे नाव | अभ्यासक्रम | ईमेल/ पत्र आवक दिनांक |
|---|---|---|---|---|
| ४ | BSCN09410 | डॉ.बी.बी.खलाडकर बी.एस.सी. नर्सिंग कॉलेज | BSCN | 01-03-2025 |
| ५ | LLB31184 | लॉ कॉलेज, किन्हवली, शहापूर, ठाणे | LLB3 | 27-03-2025 |

प्राधिकरण कार्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी ऑनलाईन शुल्क प्रस्ताव सादर करण्यासाठी अधिनियम २०१५ नूसार ३१ ऑक्टोंबर अंतिम तारिख असल्याने दि. १०/१०/२०२४ च्या सुचनेनूसार दि. ३१/१०/२०२४ ही अंतिम तारीख देण्यात आली होती. त्यांनतर अनेक महाविद्यालयांनी ऑनलाईन प्रस्ताव सादर केले नसल्याने, प्रस्ताव भरण्याकरीता प्राधिकरणाकडून मुदतवाढ मिळावी या करिता महाविद्यालयाकडून विनंती पत्र प्राप्त झाली. त्यानूसार प्राधिकरणाकडून दि. २५/१०/२०२४ च्या सूचनेनूसार दि. ३०/११/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. दि. ०२/१२/२०२४ च्या नोटीसनुसार दि. १५/१२/२०२४ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली होती.

त्यानंतरही काही महाविद्यालयांनी तांत्रिक अडचणी तसेच काही इतर कारणास्तव प्रस्ताव भरता आला नसल्याने शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३, २०२३-२०२४, २०२४-२०२५ व २०२५-२०२६ या वर्षाकरिता लिंक ओपन करुन देण्यात यावी असे अर्ज प्राधिकरण कार्यालयात प्राप्त झाल्याने दि. २९/०१/२०२५ च्या नोटीसनूसार दि. २५/०२/२०२५ पर्यंत खालीलप्रमाणे दंड आकारुन ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता :

१) शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३, २०२३-२०२४, २०२४-२०२५ – Upward Revision Rs. 2 Lakhs and No Upward Revision Rs. 5,000/-.
२) शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ : – Upward Revision Rs. 1 Lakh and No Upward Revision Rs. 5,000/-.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे महाविद्यालयांना ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्याकरिता मुदतवाढ देवूनही काही महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ व २०२५-२०२६ साठी ऑनलाईन प्रस्ताव सादर केले नाहीत. महाविद्यालांचे प्रस्ताव प्राधिकरण कार्यालयात प्राप्त झाले नसल्याने त्यांचे शुल्क प्राधिकणाकडून निर्धारित झालेले नाही. करिता, सदर महाविद्यालयांचे शुल्क निर्धारित नसल्याने महाडिबीटी पोर्टलवर शिष्यवृत्तीकरीता शुल्क मंजूर होत नाही त्यामुळे विद्यार्थ्यी शिष्यवृत्तीपासून वंचित राहु नये यासाठी. खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करिता २० व शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता ०५ महाविद्यालयांचे ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यासाठी लिंक ओपन करुन देण्यासाठी अर्ज /ई-मेल प्राप्त झालेले आहेत. सदर प्राप्त अर्ज प्राधिकरणाच्या दि. ०२/०४/२०२५ रोजीच्या बैठकीत निर्णयासाठी ठेवण्यात आले होते. त्यानुसार, विद्यार्थ्यी-यांचे नुकसान होऊ नये याकरिता खालीप्रमाणे दंड आकारुन दि. १५/५/२०२५ पर्यंत लिंक ओपन करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

१) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ : Upward Revision Rs.3 Lakhs per course and No Upward Revision Rs.5,000/- per course.
२) शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ : Upward Revision Rs.2 Lakhs per course and No Upward Revision Rs.5,000/- per course.

वरील यादीतील समाविष्ट नसलेल्या संस्थांचे उपरोक्त मुदतवाढ दि.१५/०५/२०२५ पर्यंत link open करण्यासाठी अर्ज करणा-या संस्थांना सुध्दा वरील प्रमाणे दंड आकारुन प्रस्ताव सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे.

ऑनलाईन प्रस्ताव भरल्यानंतर सदर प्रस्तावांची हार्ड कॉपी ७ दिवसांच्या आत प्राधिकरण कार्यालयात सादर करण्यात यावी.

तसेच वरील यादीतील अ.क्र १४ विद्यावर्धिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग आणि टेक्नोलॉजी, वसई, ठाणे (ईन ३१९४) आणि अ.क्र २० धन्वंतरी आयुर्वेद मेडिकल कॉलेज, उदगीर, लातूर (बी.ए.एम.एस.००३०) या महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या शुल्क निश्चितीबाबत पुनर्विलोकन अर्ज सादर केले होते. सदर अर्जांवर प्राधिकरणाच्या अनुक्रमे दि. ०६/०३/२०२५ व दि. २६/०३/२०२५ च्या बैठकीत सुनावणी घेण्यात आली व निर्णय घेण्यात आला

त्या अनुषंगाने सदर महाविद्यालयांचे पुनर्विलोकन अर्ज प्रलंबित असल्याने शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी फी निर्धारित करण्यासाठी प्रस्ताव दाखल केले होते. दि. ६.३.२०२५ व २६.३.२०२५ रोजी सुनावणी झाल्यानंतर संबंधीत संस्थाने सुनावणीच्या निर्णयानुसार निर्धारित केलेल्या शैक्षिणक वर्ष २०२४-२०२५ चे शुल्क कायदयाच्या कलम १४(ख) प्रमाणे मागिल वर्षाची शुल्क रचना पुढे म्हणजेच शै.वर्ष २०२५-२०२६ मध्ये ठेवण्यास (No Upward Revision) व सादर केलेला प्रस्ताव रद्द करण्याबाबत विनंती केली आहे.

सदर विनंती विशेष बाब म्हणून दंड न आकारता/विलंब शुल्क न आकारता त्यांचे No Upward अर्ज दाखल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.तसेच त्यांनी २०२५-२०२६ करिता सादर केलेले प्रस्ताव परत घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

क. **महिला उत्त्कर्ष प्रतिष्ठान कॉलेज ऑफ फार्मसी (बी.फार्म), वाशिम (पी.एच.१२७०)** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या ऑनलाईन भरलेल्या प्रस्तावात वास्तविक विद्यार्थी संख्या चुकीची टाकल्याने दुरुस्त करण्यासाठी लींक ओपन करुन देणेबाबत,

दिनांक ०६.०३.२०२५ चे पत्र आणि दि.१९.०३.२०२५ चा ईमेल कार्यालयास प्राप्त झाले. त्या पत्रामध्ये सदर संस्थेने शै व २०१८-२०१९ ते २०२३-२०२४ या मध्ये विद्यार्थ्यांची संख्या (२०३ ऐवजी ३०५) चुकीची टाकली असल्यामुळे ती दुरुस्त करण्याबाबत विनंती केली आहे.

चर्चेअंती असे ठरविण्यात आले की, संस्थेकडून प्राप्त विनंती अर्ज तपासून मा. सदस्य सचिव यांनी योग्य निर्णय घेऊन आपल्या तर्फे कार्यवाही करावी.

ख. **तुली कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, नागपूर (एच.एम.४२२१)** - शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ साठी प्राधिकरणाने निर्धारीत केलेले शुल्क शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी कायम ठेवण्यासाठी नो अपवर्ड करण्यासाठी लिंक ओपन करुन देणेबाबत.

या संस्थेने दि.१५ मार्च, २०२५ रोजी त्यांचे २०२१-२०२२ ला मंजूर झालेले शुल्क हे २०२२-२०२३ साठी नो अपवर्ड रिव्हिजन करण्यास विनंती केलेली आहे.

चर्चेअंती असे ठरविण्यात आले की, संस्थेकडून प्राप्त विनंती अर्ज तपासून मा. सदस्य सचिव यांनी योग्य निर्णय घेऊन आपल्या तर्फे कार्यवाही करावी.

ग. **आय बी एस ए आर स्कूल ऑफ लॉ (एल.एल.बी.५०३१)** - शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी ऑनलाईन सादर केलेल्या प्रस्तावात सुधारणा करण्यासाठी लिंक ओपन करुन देणेबाबत.

आयबीएसएआर स्कूल ऑफ लॉ या संस्थेचे दि.२८.०२.२०२५ आणि १३.०३.२०२५ च्या पत्रामध्ये सदर संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ च्या प्रस्तावामध्ये आवश्यक ती सुधारणा करण्याबाबत तसेच अतिरिक्त कागदपत्रे अपलोड करण्यासाठी विनंती केली आहे.

चर्चेअंती असे ठरविण्यात आले की, संस्थेकडून प्राप्त विनंती अर्ज तपासून मा. सदस्य सचिव यांनी योग्य निर्णय घेऊन आपल्या तर्फे कार्यवाही करावी.

घ. **कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर, रीसोड, (बी.एस.सी.ए.११२७१)** – शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी ऑनलाईन शुल्क प्रस्ताव भरताना खर्चाच्या रकमा क्लेम केल्या नसल्याने, सदर रकमा क्लेम करुन सुधारणा करण्यासाठी लिंक ओपन करुन देणेबाबत.

महाविद्यालयाने दि.१८.१२.२०२४ च्या पत्रामध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वेतनावर झालेला खर्च व वेतना व्यतिरिक्त खर्च क्लेम केले नसल्याने व त्यामध्ये सुधारणा करणेबाबत विनंती केली आहे.

चर्चेअंती असे ठरविण्यात आले की, संस्थेकडून प्राप्त विनंती अर्ज तपासून मा. सदस्य सचिव यांनी योग्य निर्णय घेऊन आपल्या तर्फे कार्यवाही करावी.

ड. **आदर्श इन्स्टिटयुट ऑफ फार्मासी,नागपूर (पी.एच.४६६५)** – शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी ऑनलाईन सादर केलेल्या प्रस्तावात काही ठिकाणी सुधारणा करण्यासाठी लिंक ओपन करुन देणेबाबत.

दिनांक ३१.१२.२०२४ च्या ईमेलद्वारे त्यांनी सुधारणा करण्यासाठी लिंक ओपन करण्याबाबत पत्र दिले आहे.

चर्चेअंती असे ठरविण्यात आले की, संस्थेकडून प्राप्त विनंती अर्ज तपासून मा. सदस्य सचिव यांनी योग्य निर्णय घेऊन आपल्या तर्फे कार्यवाही करावी.

च. **मॉडर्न एज्यूकेशन सोसायटी, वाडीया कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पूणे (ई.एन.६२८१)**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी ऑनलाईन सादर केलेल्या प्रस्तावात फॉर्म सी मध्ये सुधारणा करण्यासाठी लिंक ओपन करुन देणेबाबत.

दिनांक २०.१२.२०२४ च्या पत्रानुसार त्यांनी Edit Facility आणि Form C नुसार सुधारणा करण्याबाबत विनंती केली आहे.

चर्चेअंती असे ठरविण्यात आले की, संस्थेकडून प्राप्त विनंती अर्ज तपासून मा. सदस्य सचिव यांनी योग्य निर्णय घेऊन आपल्या तर्फे कार्यवाही करावी.

छ. **दत्ता मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, ऐरोली, नवी मुंबई (ई.एन.३१८७)** – शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ च्या शुल्क निर्धारणासाठी सादर केलेला प्रस्ताव मागे घेऊन नो अपवर्ड रिव्हीजन करण्यास परवानगी मिळणेबाबत.

संबंधित संस्थेने दिनांक २१.०३.२०२५ च्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ या वर्षासाठी प्राधिकरणाने दिनांक २८.०२.२०२५ रोजी घेतलेल्या पुनर्विलोकन सुनावणीच्यावेळी संस्थेचे शैक्षणिक शुल्क B.Engg. साठी रु.१,०१,५००/- आणि M.Engg. साठी

रु.६०,०००/- इतके शुल्क निर्धारित झाले. M.Engineering साठी पुनर्विलोकन अर्जामध्ये सुनावणीच्या वेळी रिजेक्ट करुन शुल्क (पूर्वीचे म्हणजेच २०२४-२०२५) रु.६०,०००/- ठेवण्यात आले आहे. तेच शुल्क शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी लागू करण्याबाबत व २०२५-२०२६ साठी सादर केलेला फी वाढीचा प्रस्ताव रद्द करण्याबाबत विनंती केलेली आहे.

वरील मुद्दयांवर सविस्तर विचार करुन त्यांची विनंती मान्य करुन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे :

संबंधित संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ चे शुल्क B.Engg. साठी रु.१,०१,५००/- आणि M.Engineering साठी रु.६०,०००/- हे शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी संबंधीत अभ्यासक्रमास (No Upward Revision) /लागू राहील. तसेच त्यांनी या वर्षासाठी ऑफलाईन / ऑनलाईन प्राधिकरणाकडे सादर केलेले प्रस्ताव शुल्क निर्धारणासाठी विचारात घेतले जाणार नाही या बाबत चर्चा झाली.

चर्चेअंती असे ठरविण्यात आले की, संस्थेकडून प्राप्त विनंती अर्ज तपासून मा. सदस्य सचिव यांनी योग्य निर्णय घेऊन आपल्या तर्फे कार्यवाही करावी.

**ज. माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, उमेरगा, धाराशिव (पी.एच.२६२७) –**

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ च्या शुल्क निर्धारणासाठी सादर केलेला प्रस्ताव मागे घेऊन नो अपवर्ड रिव्हीजन करण्यास परवानगी मिळणेबाबत.

संबंधित संस्थेने दिनांक २६.०३.२०२५ च्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ या वर्षासाठी प्राधिकरणाने दिनांक २०.०३.२०२५ रोजी घेतलेल्या पुनर्विलोकन सुनावणीच्यावेळी संस्थेचे शैक्षणिक शुल्क रु.५८,०००/- इतके शुल्क निर्धारित झाले. हे शुल्क शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी लागू करण्याबाबत आणि शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी सादर केलेला फी वाढीचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत (withdraw) व शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी मंजूर केलेले वार्षिक शुल्क रु.५८,०००/- प्रति विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी कायम ठेवण्यासाठी (No Upward Revision) करण्याबाबत विनंती केलेली आहे.

वरील मुद्दयांवर सविस्तर विचार करुन त्यांची विनंती मान्य करुन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे :

संबंधित संस्थेच्या विनंतीनुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ चे शुल्क रु.५८,०००/- हे शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी लागू ठेवण्यास मान्यता देण्यात येते. तसेच त्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी ऑफलाईन / ऑनलाईन प्राधिकरणाकडे सादर केलेले शुल्क निर्धारणासाठी प्रस्ताव मागे घेण्यास मान्यता देवून सदरचा प्रस्ताव संस्थेच्या विनंतीनुसार निकाली काढण्यात यावा.

**दिनांक : ०२ एप्रिल, २०२५**
**ठिकाण : मुंबई**

**(डॉ.अर्जुन चिखले, भा.प्र.से.)**
**सदस्य सचिव**
**शुल्क नियामक प्राधिकरण**
**महाराष्ट्र राज्य**